# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.१६ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## एसटी महामंडळाच्या १० टक्के हंगामी भाडेवाढीला एक महिन्याची मुदतवाढ

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- वाढत्या डिझेल दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवाशांना पुन्हा एकदा झटका दिला आहे. सध्या बससेवांसाठी लागू करण्यात आलेल्या १० टक्के हंगामी भाडेवाढीस आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून वाढीव भाडेदर आता १५ जुलै मध्यरात्रीपर्यंत कायम राहणार आहेत.

उन्हाळी गर्दीच्या पार्श्वभूमीवर महसूलवाढीसाठी १५ एप्रिलपासून लागू करण्यात आलेली ही भाडेवाढ १५ जूनला संपणार होती. मात्र, डिझेलच्या वाढत्या किंमती, कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातील वाढ आणि महामंडळावरील आर्थिक ताण लक्षात घेऊन वाढीव दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे साधी आणि मिडी बससेवांसाठी प्रति टप्पा दर ११.०५ रुपये राहणार असून प्रौढांसाठी किमान भाडे १४ रुपये आणि मुलांसाठी ७ रुपये कायम राहणार आहे.

एसटी महामंडळाला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेल लागते. राज्यातील डिझेलचा दर सध्या ९७.८३ ते ९९.५० रुपये प्रति लिटर दरम्यान असून त्यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी महामंडळाला दररोज ३३ लाख रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. हा आर्थिक भार महिन्याला १० कोटी रुपये तर वर्षभरात तब्बल १२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

# अमेरिका-इराण यांच्यात शांतता करार, डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

## इराणने कुठलीही प्रतिक्रिया न दिल्याने प्रश्नचिन्ह कायम

वॉशिंग्टन दि.१५ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यात मागील चार महिन्यांपासून सुरु असलेला संघर्ष संपवण्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्स पोस्ट करत केली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी टोल फ्री करण्यास मंजुरी दिल्याचंही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं असून अमेरिकेच्या नौदलाने केलेली नाकेबंदी हटवण्याचे अधिकृत आदेश जारी केल्याचंही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. या सगळ्याबाबत इराणने अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. पाकिस्तानकडून अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार झाल्याचं सांगण्यात आलं आहे. पण इराणने कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही त्यामुळे शांतता कराराबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे.



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल या मीडिया प्लॅटफॉर्मवरुन अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराची घोषणा केली आहे. ट्रम्प म्हणाले की इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणसोबत डील पूर्ण झाली आहे. सर्वांचं अभिनंदन. मी या माध्यमातून घोषणा करतो की होर्मुझची सामुद्रधुनी देखील टोल फ्री सुरु होईल आणि अमेरिकन नौदलाला देखील नाकाबंदी हटवण्यास मंजुरी देतोय, असं ट्रम्प म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून इंधनाचा पुरवठा ज्या देशांना होतो त्या जगभरातील जहाजांनी त्यांची इंजिन सुरु करावी आणि तेलाचा पुरवठा सुरु होऊद्यात असं ट्रम्प म्हणाले.

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी देखील एक्सवर पोस्ट करत अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराला दुजोरा दिला आहे. शहबाझ शरीफ यांनी अमेरिका (पान ४ वर)

### शांतता करार स्वीकारण्यास इस्त्रायलचा नकार

इस्त्रायलने अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार स्वीकारण्यास नकार दिला आहे. संरक्षण मंत्री इस्त्रायल काट्झ यांनी असेही म्हटले आहे की, त्यांचे सैन्य दक्षिण लेबनॉनमधून माघार घेणार नाही. लेबनॉन, सीरिया आणि गाझामध्ये स्थापित सुरक्षा क्षेत्रांमध्ये इस्त्रायली सैन्य अनिश्चित काळासाठी तैनात राहील. इस्त्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन ग्विर यांनी शांतता करारावर नाराजी व्यक्त केली आणि म्हटले, 'आम्ही अमेरिकेचे गुलाम नाही. इस्त्रायल एक स्वतंत्र देश आहे आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा हा करार इस्त्रायलला लागू होत नाही.'

### क्रूड ऑईलचे दर घसरले

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली होणार असल्याची अपडेट येताच आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्चा तेलाचे दर क्रॅश झाले. ब्रेंट क्रूड फ्यूचर्समध्ये ४ टक्क्यांची घट झाली. तर, युएस वेस्ट टेक्सास इंटरमीजिएटमध्ये ४.६० टक्क्यांची घसरण झाली. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराचे संकेत मिळताच कच्चा तेलाच्या दरात घसरण दिसून येत होती. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता करारावर सहमती झाल्याची घोषणा करताच कच्चा तेलाचे दर आणखी घसरले. ब्रेंट क्रूड चा दर ४ टक्क्यांनी घसरले आणि ८३ डॉलर प्रति बॅरलवर आले. दुसरीकडे डब्ल्युटीआय क्रुडचा दर ८० डॉलर प्रति बॅरलवर आला. एमयुआरएएन स्क्रुडचा दर देखील ८३ डॉलर वर पोहोचला.

### सोने-चांदी दरात मोठी वाढ

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- अमेरिका इराणमधील युद्ध आता संपण्याचे संकेत मिळताच सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. शनिवारी बाजारपेठ बंद होताना सोन्याचा प्रतितोळा भाव १ लाख ४८ हजार ३०० रुपये इतका होता. तो सोमवारी बाजार उघडताच १ लाख ५१ हजार रुपये प्रतितोळा इतका झाला आहे. सोन्याच्या दरात २७०० रुपयांची मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर चांदीच्या दरात ही प्रतिकिलो तब्बल १० हजार रूपयांची वाढ होऊन, शनिवारी असलेले २ लाख ४४ हजार रुपयांचे दर आज दोन लाख ५४ हजार रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. दोन्ही दर हे जीएसटी वगळून आहेत. अमेरिका इराणमधील युद्ध पूर्णपणे थांबले आहे, असे चित्र स्पष्ट झाले तर पुढील काळात सोने चांदी दरात अजूनही मोठी वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत.

# सिजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्यावर हल्ला

## राजस्थानच्या जयपूरमध्ये आंदोलनावेळी घडलेली घटना

जयपूर दि.१५ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरुणांनी कानशिलात लगावली. त्यानंतर पक्षाच्या समर्थकांनी त्या दोघांना पकडून बेदम चोप दिला. अभिजीत दीपके नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी आणि तरुणांशी संबंधित इतर समस्यांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते. अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक शहीद स्मारकावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. आंदोलनादरम्यान, घोषणाबाजीवरून काही तरुणांमध्ये वाद झाला. पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले. आंदोलनस्थळी अनेक आंदोलकांचे मोबाईल फोनही चोरीला गेले. यानंतर, व्यासपीठावरून आपले मोबाईल फोन आणि सामान सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.



आंदोलनात सहभागी झालेले तरुण 'मी माझ्या देशावर प्रेम करतो, मी भ्रष्टाचार नाकारतो' आणि 'पेपरफुटी थांबवा' यांसारख्या घोषणा असलेले फलक आणि तिरंगा घेऊन आले होते. काही महिला आपल्या लहान मुलांसोबत आंदोलनात सामील झाल्या. कार्यकर्त्यांनी शहीद स्मारकाच्या प्रवेशद्वारावर कॉकरोच चित्र काढले आणि 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या!' अशी घोषणा लिहिली. ज्या तरुणाने थप्पड मारली तो म्हणाला, 'हे लोक जिहादी मानसिकतेचे आहेत. मी जयपूरचा आहे. मी एक राष्ट्रवादी आहे. हा अभिजीत दीपके विनाकारण देशाची दिशाभूल करत आहे. ही पेपरफुटी केवळ एक निमित्त आहे.'

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके शहीद स्मारकाजवळ पोहोचताच तरुणांमध्ये झटापट झाली. दीपके यांना खांद्यावर उचलून आत नेले जात होते. यावेळी जमावातील दोन तरुणांनी त्यांना थप्पड मारली. सीजेपीच्या सदस्यांनीही त्या तरुणाला चोप दिला. कानशिलात मारणाऱ्यांना पोलिसांनी अटक करून ताब्यात घेतले आहे.

कानशिलात मारण्याच्या घटनेनंतर अभिजीत दीपके यांनी आंदोलकांना संबोधित केले. त्यांनी घोषणा दिली, हिंदू-मुस्लिम राजकारण चालणार नाही, चालणार नाही. आपण हे स्वातंत्र्य बलिदानानंतर मिळवले आहे. आपण हिंदू आणि मुस्लिमांमध्ये विभागलेले आहोत. आपण जात आणि धर्माने विभागलेले आहोत, पण आपण यात अडकून पडता कामा नये. आम्ही २० जून रोजी पुन्हा दिल्लीवर मोर्चा काढू. यावेळी, जेव्हा आम्ही दिल्लीला जाऊ, तेव्हा राजीनामा दिल्याशिवाय परत येणार नाही. त्यांनी 'दिल्ली चलो!' अशी घोषणाही दिली. राष्ट्रगीताने आंदोलनाची सांगता झाली.

# राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत पार पडलेली कामकाज सल्लागार समितीची महत्त्वाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सध्या राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफी, आगामी निवडणुका आणि राजकीय घडामोडी पाहता हे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन अत्यंत वादळी ठरण्याची शक्यता आहे. विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी केली असून, सत्ताधारी पक्ष देखील विरोधकांना चोख उत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे २२ जूनपासून मुंबईत हायव्होल्टेज राजकीय रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.

# ऑपरेशन टायरगर फायनल झाले; शिंदे सेनेच्या आमदाराचा दावा

## ठाकरेंच्या १६ आमदार आणि ७ खासदारांसोबत अंतिम बोलणी, मात्र तारीख ठरली नाही

नागपूर दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यात सद्यस्थितीत कुठल्याही निवडणुका नसताना ठाकरेंच्या शिवसेना पक्षात वेगळा गट स्थापन होत असल्याची चर्चा सुरू आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील ७ खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार असून एकनाथ शिंदेंच्या ऑपरेशन टायगरशी चर्चा होत आहे. एकीकडे ही चर्चा सुरू असताना दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १६ आमदार आणि ७ खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा त्यांनी केलाय. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला आणखी हवा मिळाली आहे. मात्र, मंत्री उदय सामंत यांनी स्पष्टपणे हा दावा फेटाळून लावला आहे.

राज्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून होत असलेल्या ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू असतानाच शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मातोश्रीवर खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला ९ पैकी ५ खासदारांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली. मात्र, त्यानंतर राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क लावले जात आहेत. त्यातच, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १६ आमदार आणि ७ खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा शिंदेंच्या शिवसेनेतील आमदार कृपाल तुमाने यांनी केला आहे. तसेच, ऑपरेशन टायगर फायनल झाले आहे, फक्त या आमदार व खासदारांच्या पक्ष प्रवेशाची तारीख ठरायची आहे. उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर शिवसेना उबाठा पक्षातील आमदार, खासदार नाराज असल्याने ते शिवसेनेत प्रवेश करत आहे, असे कृपाल तुमाने यांनी म्हटले.

### उदय सामंत यांनी ऑपरेशन टायगरची शक्यता फेटाळली

ऑपरेशन टायगरबाबत आता शिवसेना नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी महत्त्वाची माहिती दिली.उबाठाच्या कोणत्याही खासदारासोबत संपर्क नाही, अशी कोणतीही मीटिंग झाली नाही. आम्हाला ऑपरेशन टायगरची गरज नाही, असे म्हणत मंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी ऑपरेशन टायगर संदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच, संजय राऊत यांच्या पेशन्सला दाद देत त्यांनी उबाठाचं अस्तित्व टिकवलं आहे, असेही उदय सामंत यांनी म्हटलं. त्यामुळे, एकप्रकारे उदय सामंत यांनी ठाकरेंचे खासदार शिंदेंच्या संपर्कात नसल्याचेच सूचवलं आहे.

# ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे-उद्धव ठाकरेंचे उद्गार

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- 'ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे; त्यांचे भले व्हावे. बाळासाहेबांची शिवसेना सोडून जाणाऱ्यांना आज ना उद्या पश्चाताप होणार आहे', असे नाराज उद्गार उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काढले. पक्षातील काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनीखासदारांची बैठक मातोश्रीवर बोलावली होती.

या बैठकीत उद्धव ठाकरे म्हणाले की, 'आजचा दिवस माझा नसला, तर उद्याचा दिवस माझा नक्की आहे. तोपर्यंत सोसावे लागेल, सहन करावे लागेल. जे बाळासाहेबांची शिवसेना सोडून गेले, त्यांना पश्चाताप होईल. पण, तोपर्यंत वेळ गेलेली असेल', असे विधान ठाकरे यांनी खासदारांशी बोलताना केले.

उद्धव ठाकरेंनी बैठकीत शिवसेनेत झालेल्या फुटीचाही दाखल दिला. ते म्हणाले, 'मागच्या वेळी फूट पडली. तेव्हाही मला सगळं माहिती होतं, पण जबरदस्तीने हात धरून थांबवण्यात अर्थ नव्हता. त्यामुळे ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे. त्यांचे भले व्हावे. असे मी म्हणेन', असे उद्गार (पान ४ वर)

# महाराष्ट्रासह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- भारतात नैऋत्य मोसमी पावसाचा वेग मंदावला आहे. सोमवार, १५ जून रोजीच्या उपग्रह प्रतिमांमध्ये देशाच्या मोठ्या भागावर मोसमी ढगांचा अभाव दिसून आला. हवामान विभागाच्या मते, ४ जून ते १५ जून दरम्यान देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु केवळ १९.२ मिमी पाऊस झाला, ज्यामुळे पावसाची ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. मोसमी पावसाच्या मंदावण्यामुळे राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. दक्षिण भारतातून पुढे सरकल्यानंतर, मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आसपास थांबला आहे. ईशान्येकडील राज्यांमधून पुढे सरकल्यानंतर, तो बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये थांबला आहे.

हवामान विभागाच्या मते, मान्सून कमकुवत होण्याचे कारण समुद्रातील आर्द्रतेची कमतरता नसून, वरच्या वातावरणातील वाऱ्यांची असामान्य रचना आहे. यावेळी, पश्चिमी जेट स्ट्रीम नेहमीपेक्षा अधिक दक्षिणेकडे सरकली आहे, ज्यामुळे मान्सूनला गती देणाऱ्या वाऱ्यांवर परिणाम झाला आहे. यामुळे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात पुरेशी आर्द्रता असूनही ढग तयार झाले आहेत. यामुळे मान्सूनची प्रगती थांबू शकते. तथापि, येत्या काही दिवसांत तो पुढे सरकण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पाऊस सुरू आहे. महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये १७ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मराठवाड्यात १७ जूनपर्यंत आणि विदर्भात १६ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहू शकते. महाराष्ट्राच्या कोकण प्रदेशात आणि गोव्यात १७ जूनपर्यंत उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज आहे. कोकण आणि गोव्याच्या काही भागांमध्ये १६ जूनपर्यंत रात्रीच्या वेळीही उष्णता कायम राहील.

# मोदींना रोखण्यासाठी देशात आता काँग्रेस हाच एकमेव पर्याय, हर्षवर्धन सपकाळांचा दावा

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- देशातील बदलत्या राजकीय समीकरणांवर भाष्य करताना काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी एक मोठे विधान केले आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रोखण्यासाठी राहुल गांधी हाच एकमेव पर्याय आहे, असे सपकाळ यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधान परिषद निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांनी पैशांचा अमाप वापर केल्याचा आरोप त्यांनी केला. एका वृत्तवाहिनीशी बोलताना सपकाळ म्हणाले, ‘‘सध्या पैसा फेक तमाशा देख अशी परिस्थिती आहे. विरोधकांचे अर्ज तांत्रिक कारणांवरून बाद करणे, उमेदवारांवर दबाव आणून अर्ज मागे घ्यायला लावणे, असे प्रकार सुरू आहेत. सत्ताधारी साम-दाम-दंड-भेदाचा वापर करून निवडणुकीत थैमान घालत आहेत.‘‘ शरद पवारांची राष्ट्रवादी आणि ममता बॅनर्जींचा तृणमूल काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार का? या प्रश्नावर त्यांनी सूचक उत्तर दिले. भाजपविरोधात देशात काँग्रेस हाच एकमेव सक्षम प्रवाह आहे. या पार्श्वभूमीवर अशा चर्चा रंगणे स्वाभाविक आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आणि नेत्यांच्या हायकमांडकडे गेलेल्या तक्रारींचे सपकाळांनी खंडन केले. काँग्रेस पक्षांतर्गत कोणतीही नाराजी नाही. काँग्रेसच्या आंदोलनांना मिळणारा जनतेचा प्रतिसाद पाहून घाबरलेल्या भाजपनेच या केवळ वावड्या उठवल्या आहेत. असा टोला बोलताना त्यांनी लगावला.

# विदर्भ वगळता राज्यातील शाळा आजपासून सुरू; मुख्यमंत्र्यांकडून जिल्हा परिषद शाळांचे कौतुक

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- महिनाभराच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर आजपासून राज्यातील विदर्भ वगळता शाळांना अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी शाळेत पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला. राज्यभरात विविध ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि शिक्षकांनी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांचे मनोबल वाढवले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पनवेलमधील वहाळ येथील जिल्हा परिषद शाळेला थेट भेट दिली. यावेळी त्यांनी तेथील आधुनिक शिक्षणपद्धती आणि शिक्षकांच्या कामाचे भरभरून कौतुक केले. ‘‘आज जिल्हा परिषदेतील शाळांचे शिक्षण हे ९० टक्के खाजगी शाळांपेक्षाही अधिक चांगल्या दर्जाचे झाले आहे,‘‘ असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पिंपरी चिंचवडमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेत बोलताना सुनेत्रा पवार यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, ‘‘शाळेचा पहिला दिवस ही माझ्या जिव्हाळ्याची बाब आहे. पूर्वी शाळेच्या पहिल्या दिवशी रडारड व्हायची, पण आता परिस्थिती बदलली आहे. शाळा असो की शासकीय इमारत, ती दर्जेदारच असायला हवी, असा अजितदादांचा अट्टाहास असायचा. म्हणूनच आज जिल्हा परिषद शाळा मॉडेल बनत असून, इथे अत्याधुनिक लॅबच्या माध्यमातून प्रात्याक्षिकांसह दर्जेदार शिक्षण दिले जात आहे.

अमरावती जिल्ह्यातील सीबीएसई आणि राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व (पान ४ वर)

# अभिषेक बॅनर्जी यांची ईडीकडून चौकशी

कोलकाता दि.१५ (वृत्तसंस्था)- शालेय नोकरीसाठी लाच घेतल्याच्या प्रकरणात ईडीकडुन आज टीएमसीचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांची चौकशी करण्यात आली. त्यांना ३ जून रोजी नोटीस बजावण्यात आली होती, ज्यात १५ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत एजन्सीसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. या प्रकरणात सीबीआय आणि ईडी या दोन्हीच्या आरोपपत्रांमध्ये अभिषेक यांचे नाव आहे. यापूर्वी रविवारी, आमदारांच्या बनावट सह्या प्रकरणात सीआयडीने त्यांची आठ तास चौकशी केली होती. या प्रकरणात अभिषेक १६ जून रोजी पुन्हा सीआयडीसमोर हजर होणार आहे. कोलकाता पोलिसांनी १३ जून रोजी पहाटे ३ वाजता अभिषेक बॅनर्जींच्या कालीघाट येथील घरावर छापा टाकला. पोलिसांचे पथक केंद्रीय पोलिसांच्या जवानांसोबत आले होते. पोलीस अधिकारी आत गेले, तर सैनिक गेटबाहेर पहारा देत होते. ही शोधमोहीम सुमारे चार तास चालली. छाप्याची माहिती मिळताच ममता बॅनर्जी तत्काळ अभिषेकच्या घरी आल्या, थोडा वेळ थांबल्या आणि नंतर निघून गेल्या. पोलिसांच्या सूत्रांनुसार, अभिषेकचा वैयक्तिक सहाय्यक, सुमित रॉय याचा शोध घेण्यासाठी हा छापा टाकण्यात आला होता. अभिषेक यांनी आरोप केला आहे की, पोलीस अधिकाऱ्यांनी घरात जबरदस्तीने प्रवेश करून प्रत्येक खोलीची झडती घेतली. बनावट सही प्रकरणात अभिषेकविरुद्ध सीआयडीचा तपास सुरू असतानाच त्याच्या घरावर हा छापा टाकण्यात आला.

# मंत्री गिरीश महाजनांच्या मध्यस्थीने रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन मागे

पंढरपूर दि.१५ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे गेल्या तीन दिवसांपासून पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरु होते. आज अखेर त्यांनी तीन दिवसानंतर उपोषण सोडले आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत रोहित पवारांनी उपोषण मागे घेतले. २२ जूनच्या आधी मुंबईत बैठक होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी बोलावल्याची माहिती रोहित पवार यांनी सांगितले. आपल्या मागण्यासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्याचा विचार सरकार करत आहे. या अटीसंदर्भात काय करता येईल यासाठी आपल्याला कमिटीकडे जावे लागेल असे महाजन यांनी सांगितल्याचे रोहित पवार म्हणाले.

शेतकऱ्यांच्या वतीने ४ जुलैला मोठे आंदोलन घेणार आहोत असे रोहित पवार म्हणाले. आपली बैठक ठरली आहे. यामध्ये कोणतेही राजकारण नाही. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये ही आमची भूमिका असल्याचे रोहित पवार म्हणाले. यावेळी रोहित पवार यांनी गिरीश महाजन यांचे अभिनंदन केले. कर्जमाफी योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले आहे. मी ज्या मतदारसंघात काम करतो तिथेच अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म झाला आहे. सरकारनं काढलेला जीआर महत्वाचा आहे. सरकारचे अभिनंदन करतो. फक्त या जीआरमध्ये अनेक अटी आहेत. यामुळं अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. २०१९ ची कर्जमाफी झाली. त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी लाभ घेतला त्यांना आताच्या या योजनेमध्ये लाभ झाला पाहिजे. सरसकट कर्जमाफी करा अशी मागणी आहे. रविकांत तुपकर बुलढाण्यात ते आंदोलन करत आहेत. त्यांना देखील भेटा असे रोहित पवार म्हणाले. रेग्युलर शेतकऱ्यांना ५० हजारांचे लिमिट आहे ते वाढवाले पाहिजे असे रोहित पवार म्हणाले.

कर्जमाफी झाल्यावर रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागण्यासंदर्भात पत्र देणं गरजेचं होते. असे केले असते तर उपोषणाची वेळ आली नसती. काहीतरी मार्ग निघाला असता असे महाजन म्हणाले. जवळपास ३७ हजार कोटी रुपयांपर्यंत कर्जमाफी केली जाणार आहे. चर्चा केल्यावर सकारात्मक (पान ४ वर)

# अभिनेत्री संचिता उगलेची आत्महत्या



मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- टेलिव्हिजन इंडस्ट्रीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. टेलिव्हिजन इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री संचिता उगले हिनं आपलं आयुष्य संपवलं आहे. अवघ्या ३०व्या वर्षी संचितानं टोकाचं पाऊल उचलल्यामुळे अख्खं मनोरंजनविश्व हादरलं आहे.

अभिनेत्री संचिता उगले मुंबईतील नालासोपाला परिसरात अचोले पोलीस स्थानकाच्या परिसरात राहते. संचितानं रविवारी, संध्याकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास संचितानं टोकाचं पाऊल उचलल्याचं सांगितलं जातंय. तर, अभिनेत्री संचिता उगाले हिच्या अशा जाण्यानं अवघी इंडस्ट्री हादरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिनेत्री संचिता उगले आपले आई-वडील आणि बहिणीसोबत नालासोपाऱ्यातील परिसरात राहत होती. घरी एकटी असतानाच संचितानं टोकाचं पाऊल उचललं. संचितानं राहत्या घरात साडीनं गळफास घेत आपलं आयुष्य संपवलं. घटनास्थळी सुसाईड नोट सापडली नसल्याचंही पोलिसांनी सांगितलं असून सध्या पोलीस या प्रकरणी अधिक चौकशी करत आहेत.

# रक्तरंजित संघर्षाची चार वर्षे, युद्धाचे सावट कायम

चार वर्षांपासून सुरू असलेल्या रक्तरंजित संघर्षामुळे संबंधित प्रदेशात मोठ्या प्रमाणावर मानवी, आर्थिक आणि सामाजिक हानी झाली आहे. हजारो लोकांचा मृत्यू झाला असून लाखो नागरिक विस्थापित झाले आहेत. शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले; परंतु संघर्ष पूर्णपणे थांबलेला नाही. युद्धामुळे पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत आणि सामान्य जनजीवनावर गंभीर परिणाम झाला आहे. सध्या संघर्षाची तीव्रता काही प्रमाणात कमी-जास्त होत असली तरी युद्धाचे सावट अजूनही कायम आहे आणि दीर्घकालीन शांततेचा मार्ग अनिश्चित दिसत आहे.

जगातील युद्धे आज पूर्वीपेक्षा अधिक घातक, अधिक खर्चिक आणि अधिक अनिश्चित झाली आहेत. २०२१ ते २०२४ या कालावधीत गोळ्या, बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांमुळे सुमारे ७.५ लाख लोकांचा मृत्यू झाला. युद्धांमुळे निर्माण होणारी उपासमार, रोगराई, विस्थापन आणि इतर अप्रत्यक्ष परिणाम यांचाही विचार केला, तर हा आकडा आणखी मोठा ठरतो. शीतयुद्ध संपल्यानंतरचा हा चार वर्षांचा कालखंड सर्वाधिक रक्तरंजित मानला जातो. मात्र, एवढ्या प्रचंड मानवी आणि आर्थिक हानीनंतरही कोणत्याही पक्षाला स्पष्ट व निर्णायक विजय मिळालेला दिसत नाही. याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे रशियाने युक्रेनवर केलेले आक्रमण. रशियाला झटपट विजयाची अपेक्षा होती; परंतु युद्ध दीर्घकाळ लांबल्याने ते राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासाठी एका दलदलीसारखे ठरले. त्याचप्रमाणे इराणविरोधातील अमेरिकेच्या कारवायांनाही अपेक्षित यश मिळाले नाही. हे संघर्ष आधुनिक युद्धाचे बदलते स्वरूप, त्यातील वाढती गुंतागुंत आणि विजयाच्या पारंपरिक संकल्पनांवर उभे राहिलेले प्रश्न अधोरेखित करतात. युद्धाच्या स्वरूपात सर्वात मोठा बदल तंत्रज्ञानामुळे झाला आहे. आज उपग्रह, सेन्सर्स आणि कमी खर्चातील ड्रोन यांच्या साहाय्याने सैनिकांच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवणे शक्य झाले आहे. त्यामुळे रणांगणावर मोठ्या सैन्यदलांची हालचाल पूर्वीपेक्षा अधिक धोकादायक ठरते. सैनिकांना स्वतःचे संरक्षण करण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागत आहे. युक्रेनमधील विस्तारित किल झोन हे त्याचे उदाहरण आहे.

तेथील सैनिक आता लहान-लहान गटांमध्ये पुढे सरकतात, तर जखमी आणि मृत सैनिकांना बाहेर काढण्यासाठी रोबोट्सचा वापर केला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, शत्रूच्या कमकुवत भागावर अचानक हल्ला करून निर्णायक आघाडी मिळवण्याची पारंपरिक युद्धनीती आता पूर्वीसारखी प्रभावी राहिलेली नाही. दुसरा मोठा बदल कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)मुळे घडला आहे. एआयमुळे प्रचंड प्रमाणातील माहितीचे अतिशय वेगाने विश्लेषण करणे शक्य झाले आहे. उपग्रह चित्रे, ड्रोनद्वारे मिळणारा डेटा आणि रणांगणावरील विविध सेन्सर्सकडून येणारी माहिती एकत्रित करून शत्रूची स्थिती, हालचाली आणि संभाव्य रणनीती यांचा अंदाज अधिक अचूकपणे लावता येतो. त्यामुळे निर्णयप्रक्रिया जलद होत असून लक्ष्य निवडणे, संसाधनांचे नियोजन करणे आणि हल्ल्यांचे समन्वय साधणे अधिक प्रभावी बनले आहे. भविष्यात स्वायत्त शस्त्रप्रणाली, एआय-आधारित ड्रोन आणि रोबोटिक यंत्रणा युद्धातील मानवी भूमिकेत आणखी बदल घडवू शकतात. त्यामुळे आधुनिक युद्ध हे केवळ सैनिकांच्या संख्येवर नव्हे, तर माहिती, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापरावर अधिक अवलंबून होत चालले आहे.

एआय-आधारित प्रणाली आता लक्ष्य शोधणे आणि त्यावर अचूक हल्ले करण्यासाठी सैन्यदलांना मोठी मदत करत आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणविरोधातील कारवायांमध्ये या तंत्रज्ञानाची क्षमता अधोरेखित केली आहे. मात्र, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही इराणला माघार घ्यायला भाग पाडण्यात यश आलेले नाही. उलट, इराणने ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले सुरूच ठेवले असून आपल्या अणू कार्यक्रमाबाबतची भूमिका देखील कायम ठेवली आहे. यावरून एक महत्त्वाची बाब स्पष्ट होते, की तांत्रिक श्रेष्ठता म्हणजेच राजकीय किंवा लष्करी विजयाची हमी नव्हे. तिसरी आणि तितकीच गंभीर चिंता म्हणजे युद्धनियम आणि मानवी मूल्यांवर वाढत असलेला दबाव. युक्रेनपासून गाझापर्यंत अनेक संघर्षक्षेत्रांमध्ये नागरी लोकसंख्येवर हल्ले, रुग्णालयांसारख्या संरक्षित ठिकाणांना लक्ष्य केल्याचे आरोप आणि आंतरराष्ट्रीय युद्धनियमांच्या उल्लंघनाच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. या सर्व घडामोडी एक महत्त्वाचा संदेश देतात.

युद्ध सुरू करणे कदाचित पूर्वीपेक्षा सोपे झाले असेल; परंतु ते जिंकणे आणि त्याचा शेवट घडवून आणणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे तुलनेने कमकुवत राष्ट्रांनाही प्रभावी प्रतिकार करण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. परिणामी, भविष्यातील युद्धे अधिक दीर्घकालीन, अधिक खर्चिक आणि अधिक विनाशकारी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. युद्धाचे स्वरूप गेल्या काही दशकांत तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणात बदलले. आधुनिक युद्धात सेन्सर्स, उपग्रह आणि ड्रोन यांसारख्या निरीक्षण साधनांचा व्यापक वापर होत असल्याने रणांगणातील हालचाली गुप्त ठेवणे अधिक कठीण झाले आहे. परिणामी, सैनिकांच्या सुरक्षिततेसमोरील धोके वाढले असून शत्रूच्या हालचालींची माहिती अधिक वेगाने आणि अचूकपणे मिळू लागली आहे. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) युद्धाच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत आहे. एआयच्या साहाय्याने लक्ष्य शोधणे, माहितीचे विश्लेषण करणे आणि अचूक हल्ल्यांचे नियोजन करणे अधिक प्रभावी झाले आहे. त्यामुळे युद्ध अधिक वेगवान, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि परिणामकारक बनले आहे. मात्र, या तांत्रिक प्रगतीसोबत काही गंभीर आव्हानेही समोर आली आहेत. अनेक संघर्षांमध्ये नागरिकांवरील हल्ले, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि युद्धनियमांचे वाढते उल्लंघन दिसून येत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे, मानवी मूल्ये आणि युद्धातील नैतिकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत असून जागतिक समुदायासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत.

नागरिकांवरील हल्ले आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे आणि मूल्यांवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तंत्रज्ञानाचा प्रसार अतिशय वेगाने होत आहे. लेबनॉनमध्ये इस्रायली सैन्याला आता युक्रेनमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रकारच्या ड्रोनचा सामना करावा लागत आहे. खाडी युद्धातील इराकच्या स्कड क्षेपणास्त्रांच्या तुलनेत इराणची क्षेपणास्त्रे अधिक अचूक मानली जातात. भविष्यात चीनने तैवानवर हल्ला केल्यास त्याच्या सैन्यालाही मोठ्या प्रमाणातील ड्रोन हल्ल्यांचा सामना करावा लागू शकतो.

नव्या पिढीतील ड्रोनमुळे हवाई वर्चस्व टिकवणे आणि सैनिकांचे संरक्षण करणे अधिक आव्हानात्मक झाले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधातील संघर्ष लहान आणि जलद स्वरूपाचा असेल, असा अंदाज व्यक्त केला होता. मात्र प्रत्यक्षात हा संघर्ष अमेरिकेच्या महागड्या शस्त्रसाठ्याचा मोठ्या प्रमाणावर वापर आणि आर्थिक नुकसान सहन करण्याच्या मर्यादांशी संबंधित आव्हानांमध्ये रूपांतरित झाला. अफगाणिस्तान आणि व्हिएतनाममधील युद्धांमध्ये तुलनेने कमकुवत पक्षांनी स्वतःच्या भूमीवर लढत दिल्यामुळे वरचष्मा मिळवला होता; परंतु आज ड्रोन आणि क्षेपणास्त्र तंत्रज्ञानामुळे लहान किंवा कमकुवत देशांनाही दूरवरून प्रभावी प्रत्युत्तर देण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. त्यामुळे आधुनिक युद्धांमध्ये शक्तीचे पारंपरिक समीकरण मोठ्या प्रमाणात बदलत आहे.

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.



भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.

वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.

अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.

वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळिवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.

आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे 'वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# घर : उतारवयातील आर्थिक भागीदार

पुण्यात राहणारे देशमुख काका आणि काकू. वय अनुक्रमे ६५ आणि ५८. आज त्यांच्या कोथरूडमधील फ्लॅटची किंमत जवळपास ३ कोटी रुपये आहे. पण हा फ्लॅट त्यांना आयता मिळालेला नाही. चाळिशीत असताना त्यांनी कोश डेरप घेतल, अनेक वर्षे एचख भरले, काटकसर केली आणि शेवटी हे घर स्वतःच्या मालकीचं केलं. मुलगा अमेरिकेत स्थायिक आहे, मुलगी बंगळुरूत. दोघेही सुखात आहेत. पण देशमुख दांपत्यासमोर एक प्रश्न उभा राहिला आहे. घर आहे, पण नियमित उत्पन्न नाही. ऋऊ वरील व्याज कमी पडू लागलं आहे. वाढते वैद्यकीय खर्च आहेत. मुलांकडे मागायचे नाही आणि आयुष्याच्या या टप्प्यावर पैशांची चिंता करत बसायचं नाही. अशा वेळी त्यांना ' रिव्हर्स मॉर्गेज ' या योजनेची माहिती मिळाली आणि त्यांना जाणवलं की आयुष्यभर ज्यासाठी कष्ट केले, ते घरच आता त्यांच्यासाठी काम करू शकतं.

सामान्य माणसाने घराला नेहमी संपत्तीपेक्षा जास्त काहीतरी मानलं आहे. ते फक्त चार भिंतीचं बांधकाम नसतं. त्यात आयुष्याची कमाई, आठवणी, त्याग आणि स्वप्न गुंतलेली असतात. म्हणूनच 'घरावर कर्ज' हे शब्द ऐकले की अनेक ज्येष्ठ नागरिक घाबरतात. पण रिव्हर्स मॉर्गेज हे नेहमीच्या कर्जासारखं नाही. यात घर विकावं लागत नाही, घर सोडावं लागत नाही आणि मालकीही तुमच्याच नावावर राहते. उलट तुम्ही ज्या घरात राहता, तेच घर तुमच्या उत्पन्नाचा स्रोत बनतं. विशेषतः ज्यांना पेन्शन नाही, ज्यांची बचत कमी पडू लागली आहे किंवा ज्यांना मुलांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहायचं नाही, त्यांच्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरू शकते.

रिव्हर्स मॉर्गेजमध्ये तुम्ही तुमचं स्वतःचं राहतं घर बँकेकडे तारण ठेवता आणि बँक तुम्हालाच दरमहा पैसे देते. साधारणपणे ६० वर्षांवरील व्यक्ती यासाठी पात्र असतात. पती-पत्नी संयुक्त अर्जदार असू शकतात. घराची मालकी मात्र तुमच्याच नावावर राहते. देशमुख काकांच्या ३ कोटी रुपयांच्या घराचं उदाहरण घेतलं तर बँक साधारणपणे घराच्या किमतीच्या ४० ते ६० टक्के मूल्य विचारात घेते. म्हणजे सुमारे १.२ ते १.८ कोटी रुपयांच्या आधारावर त्यांना योजना मिळू शकते. प्रत्यक्ष मासिक रक्कम, बँक व्याजदर, वय आणि योजनेच्या अटींवर अवलंबून असते. पण अशा मूल्याच्या मालमत्तेवर साधारणपणे दरमहा ५० हजार ते १ लाख रुपयांच्या आसपास मासिक उत्पन्न मिळू शकतं. काही घरांसाठी ते यापेक्षा कमी किंवा अधिकही असू शकतं. मुद्दा एवढाच की आयुष्यभर कष्टाने उभं केलेलं घर आता खर्चाचं ओझं न राहता उत्पन्नाचं साधन बनतं. त्यांना आता जगभर प्रवास करायचा असेल, चांगले उपचार घ्यायचे असतील किंवा फक्त निर्धास्तपणे जगायचं त्यांच्यासाठी देखील हा एक स्वतंत्र उत्पन्नाचा स्रोत तयार होतो.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तुम्ही तुमच्या घरातच राहू शकता. अनेक जण म्हणतात, 'घर भाड्याने दिलं तर उत्पन्न मिळेल ना?' पण जर तुमच्याकडे एकच घर असेल तर ते भाड्याने दिल्यानंतर स्वतः कुठे राहायचं हा प्रश्न उभा राहतो. मोठ्या शहरांमध्ये मिळणारं भाडं आणि स्वतः राहण्यासाठी द्यावं लागणारं भाडं यांचा हिशोब कधीच जुळत नाही. त्यामुळे एकच घर असलेल्या आणि त्याच घरात राहून उत्पन्न हवं असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी रिव्हर्स मॉर्गेज हा अनेकदा अधिक व्यवहार्य पर्याय ठरतो. कारण घरही तुमच्याकडे राहते आणि त्यातून उत्पन्नही मिळतं.

खरं तर ही योजना काही विशिष्ट प्रकारच्या कुटुंबांसाठी अधिक उपयुक्त ठरू शकते. मुलबाळ नसलेली दांपत्य, फक्त मुली असलेले आणि त्या आपल्या संसारात स्थिरावलेल्या पालक, परदेशात किंवा दूरच्या शहरांत राहणारी मुलं असलेली कुटुंबं, तसेच म्हातारपणी कोणावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहायचं नाही असं ठरवलेले ज्येष्ठ नागरिक, या सगळ्यांसाठी हा पर्याय गंभीरपणे विचार करण्यासारखा आहे. कारण सर्वांची मुलं आई वडिलांना टाकून देत नसले तरी प्रत्येकाला आईवडिलांना स्वतःच्या घरी नेता येत नाही. मुलांकडे हात पसारायला आई वडिलांना आवडत नाही. मग अशा वेळी आर्थिक स्वावलंबन हीच सर्वात मोठी सुरक्षितता ठरते.

समजा काही वर्षांनी देशमुख काकांचं निधन झालं तरी काकू संयुक्त अर्जदार असल्यामुळे त्या पुढेही आयुष्यभर त्या घरात राहू शकतात. बँक त्यांना बाहेर काढू शकत नाही. शिवाय योजनेच्या अटींनुसार त्यांना मिळणारी देयकेही सुरू राहू शकतात. त्यामुळे जोडीदार गेल्यानंतर अचानक आर्थिक आधार तुटत नाही. ही बाब विशेषतः एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ महिलांसाठी खूप महत्त्वाची आहे. पुढे काकूंचंही निधन झाल्यानंतर मुलांसमोर दोन पर्याय असतात. एक म्हणजे बँकेची थकबाकी भरून घर स्वतःकडे ठेवणं. दुसरा म्हणजे घर विकणं. समजा त्या वेळेस घराची किंमत ५ कोटी रुपये झाली आहे आणि रिव्हर्स मॉर्गेजमधून मिळालेली रक्कम व त्यावरील व्याज मिळून बँकेची एकूण थकबाकी २ कोटी रुपये झाली आहे. अशा वेळी घर विकल्यास सर्वप्रथम बँकेचे २ कोटी रुपये फेडले जातील आणि उर्वरित ३ कोटी रुपये वारसांना मिळतील. म्हणजे रिव्हर्स मॉर्गेज केल्यामुळे मुलांना काहीच मिळणार नाही असं नाही. उलट अनेकदा मालमत्तेच्या वाढलेल्या किमतीचा फायदा वारसांनाही मिळतो. जर वारसांना घर विकायचं नसेल, तर ते बँकेची थकबाकी भरून घर स्वतःच्या मालकीत ठेवू शकतात.

सिनियर सिटीझन ह्यात सहभागी झाल्यास काही घरांमध्ये वर्षातून एकदाच फोन करणारी मुलं, रिव्हर्स मॉर्गेजमधून आई-वडिलांना उत्पन्न सुरू झाल्यावर अचानक नियमित फोन करू लागतील, त्यांचं प्रेम उतू जाऊ लागेल! ह्यातील विनोद बाजूला ठेवला तर एक गोष्ट खरी आहे. ती म्हणजे म्हातारपणी सन्मानाने जगण्यासाठी पैशांची गरज असते आणि त्या पैशांसाठी मुलांकडे पहावं लागू नये असे प्रत्येकाला वाटत असत. त्यातून प्रत्येक मुलगा 'वंशाचा दिवा' ठरेलच असं नाही. प्रत्येक मूल म्हातारपणी आई-वडिलांचा आधार बनेलच असंही नाही. पण आयुष्यभराच्या कष्टातून तुम्ही स्वतः उभं केलेलं तुमचं घर मात्र तुम्हाला कधीच सोडून जात नाही. गरज पडली तर रिव्हर्स मॉर्गेजच्या माध्यमातून तेच घर तुमच्या उतारवयाचा आर्थिक आधार बनू शकतं. आपणच तयार केलेल्या ॲसेटचा आपल्या हयातीत, ताठ मनानें जगायला पुरेपूर वापर करता येतो. अनेकांसाठी खरा प्रश्न 'वंशाचा दिवा कोण?' हा नसून 'आयुष्यभर साथ कोण देणार?' हा आहे. आणि त्याचं उत्तर अनेकदा आपल्या स्वतःच्या घरातच दडलंलेलं असतं. फक्त ते अनेकांना माहीत नसतं. म्हणून हा लेखन प्रपंच.

**-मंदार जोग**

# एचपीव्ही लसीकरणाबाबत आयुक्तांचे निर्देश; पात्र विद्यार्थिनींचे १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बैठकीत आयुक्त अमोल येडगे यांनी १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही (कझत) लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळिवण्यासाठी एचपीव्ही लस प्रभावी ठरत असल्याने पात्र वयोगटातील सर्व विद्यार्थिनींचे लसीकरण करून घेण्याबाबत त्यांनी मुख्याध्यापकांना निर्देश दिले.

यावेळी त्यांनी शाळास्तरावर एचपीव्ही लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. तसेच विद्यार्थिनींच्या पालकांना या लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगून त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

पुढील पंधरा दिवसांत प्रत्येक शाळेतील १४ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व पात्र विद्यार्थिनींचे नजीकच्या मनपा आरोग्य केंद्रामार्फत एचपीव्ही लसीकरण पूर्ण होईल, यासाठी आवश्यक समन्वय, जनजागृती आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याचे निर्देश आयुक्त येडगे यांनी दिले. पात्र विद्यार्थिनींच्या १०० टक्के लसीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुख्याध्यापकांनी विशेष लक्ष देऊन कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# वैजापूर तालुक्यात शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेश गुलाब फुले,पुस्तके, चॉकलेट वाटून प्रवेश जल्लोषात



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – उन्हाळी सुट्टीनंतर शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा विद्यार्थ्यांच्या चिवचिवाटाने सोमवार (ता.१५) रोजी गजबजल्या कुठे नवीन प्रवेश घेणाऱ्याना गुलाब फुले देण्यात आली, तर कुठे नवीन शैक्षणिक साहित्य,तर कुठे मुलांना आवडीच्या खेळ साहित्य खेळायला देऊन त्यांच्यात आवड निर्माण करण्यात आली,कुठे गाणी म्हणून तर कुठे चॉकलेट वाटून ,तर कुठे रांगोळी काढून व फुगे लावून मुलांमध्ये शाळेची व शिक्षणाची आवड निर्माण करून प्रवेश दिले गेले.वैजापूरच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात पालिका सभापती दशरथ बनकर, महेश भालेराव,जि.प.उपशिक्षणाधिकारी अरुण शिंदे,सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत व मू.अ.नीता पाटील यांनी मुलांना गुलाब पुष्प देऊन,प्रवेश फित सोडून,शैक्षणिक साहित्य देऊन, खेळाच्या विविध स्पर्धाघेऊन तर धोंडीराम राजपूत यांनी ,'शिकू, शिकू,शिकू शाळा आपण शिकू', तसेच 'शाळेत जाऊ या, शाळा शिकू या' कविता सादर करून मुलांना व पालकांना शिक्षण महत्व समजावून सांगत नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.तालुक्यातील खंडाळा व शिरूर गटात जि.प.सदस्य संजय निकम, सभापती श्रीमती जाधव, पं.स.सदस्य शेख यांनी विद्यार्थ्यांना पुस्तके वाटून विद्यार्थी प्रवेशाचे स्वागत केले. शहरातील पालिकेच्या शाळातही विद्यार्थ्यांचा

प्रवेश जल्लोषात झाला. या समयी पालकांची मोठी गर्दी होती. या प्रसंगी शिक्षक बी.बी. जाधव, सुवर्णा बोर्डे, राजश्री बंड, वैशाली पगारे, सुभाष गोमलाडू, लता सुखासे, ज्योती दिवेकर, सुनीता वसावे, श्रीशेळके, क्रीडा शिक्षक श्री. बोढरे, श्री. तगरे, यांनी सहभाग नोंदविला.

# शिक्षणाचे महत्व तळा-गळातील घटकांपर्यंत पोहचावे: म्हणून भिडेवाडा पहिली मुलींची शाळा व विद्ये विना मती गेली संदेश देणारा- विचारांचा रथ वैजापूरात

वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – वर्ष १८४८साली पुण्यातील भिडेवाडा येथे पहिली मुलींची शाळा सुरू झाली, या घटनेला १७८वर्ष होत आहेत व थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्म वर्ष निमित्त तसेच त्यांनी दिलेल्या शिक्षणाचे तत्व 'विद्ये विना मती गेली, मती विना --' याबाबत शिक्षणाचे महत्व राज्यातील तळा-गाळातील घटकांपर्यंत पोहचावे या साठी शाळेची प्रतिकृती,तसेच विद्ये विनाचे लेखन, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा व राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा असलेला रथ रविवार(ता-१४)रोजी वैजापूर शहरात येताच शिव-फुले-शाहू-आंबेडकर महोत्सव विचार मंचाच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले.

हा रथ शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ आल्यावर डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच महात्मा जोतिबा फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येऊन येथुन पुढे येवला, नाशिकला जाण्यासाठी रथ चालक गोविंद निगळे व सहायक नाना चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.या समयी विचारमंचचे सर्वश्री आबासाहेब जेजुरकर ,जगन गायकवाड, दिलीप अनर्थे, रतीलाल गायकवाड, मोतीराम वाघ, अशोक देवकर, धोंडीरामसिंह राजपूत, बाबासाहेब गायकवाड यांनी निरोप दिला.



रथाचे वैजापूरात पैठणहून आगमन झाले.तेंव्हा त्यांच्या स्वागत प्रित्यर्थ काशिनाथदादा गायकवाड, स्वप्नील जेजरूकर,शिव-फुले, शाहू-आंबेडकर विचार मंचचे सर्वश्री जगन गायकवाड, आबासाहेब जेजुरकर, दिलीप अनर्थे, बाबासाहेब गायकवाड, अशोक देवकर, धोंडीरामसिंह राजपूत, बाबासाहेब गायकवाड यांनी निरोप दिला. रथाचे वैजापूरात पैठणहून आगमन झाले.तेंव्हा त्यांच्या स्वागत प्रित्यर्थ काशिनाथदादा गायकवाड, स्वप्नील जेजरूकर, शिव-फुले, शाहू-आंबेडकर विचार मंचचे सर्वश्री जगन गायकवाड, आबासाहेब जेजुरकर, दिलीप अनर्थे, बाबासाहेब गायकवाड, अशोक देवकर,रतीलाल गायकवाड, माजी नगरसेविका श्रीमती गायकवाड, प्रमोद पठारे, विलास म्हसके आबा-साहेब कसबे, जीवन पठारे, दर्शन गायकवाड, ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत, विनोद गायकवाड, यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रथ परिक्रमेचे आयोजन अखिल भारतीय समता परिषदेच्याद्वारे करण्यात आलेले आहे. जगन गायकवाड,अशोक देवकर. दर्शन गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# दलित मित्र पुरस्कार विजेते कै. व्ही. जी. शिंदे यांना वैजापूरकरांचा अखेरचा निरोप



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – येथील वसंत क्लबचे उपाध्यक्ष महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित केलेले तसेच श्री. स्वामी समर्थ सांस्कृतिक मंडळाच्या वतीने वैजापूर भूषण पुरस्कार मिळालेले कै.व्हि. जी. शिंदे यांचे नुकतेच निधन झाले.

रविवार (ता.१४) रोजी सांयकाळी साडे सात वाजता वसंत क्लब च्या पदाधिकारी सदस्यांनी भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली. माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर, माजी नगराध्यक्ष साबेरखान, जि.प.सदस्य संजय निकम, डॉ. एस.एम. जोशी, जेष्ठ विधज्ञ ॲड. बाबुराव परदेशी, मेजर सुभाष संचेती, सचिव ॲड. दहीभाते, बाबासाहेब जगताप. माजी सचिव जफरखान, प्रा.व्ही.एन. ढाकरे, समाज कार्यकर्ते ठाकूर धोंडीरामसिंह राजपुत, सलीम वैजापूरी यांनी शब्दरूपी श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी डॉ. संतोष गंगवाल, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, विलास रमैय्या. सावनसिंह राजपूत, प्रा. किसन बोरनारे, प्रा.के.ए.मगर, कय्युमशेठ सौदागर, डॉ.निलेश भाटिया, भगवानसिंह राजपूत, बळीराम राजपूत, गोटूसिंह राजपूत व क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणाऱ्या 'राजा शिवाजी'ची बॉक्स ऑफिसवर किती कमाई झाली ?

**मराठी** चित्रपटसृष्टीत सध्या धमाकेदार चित्रपटांची मेजवानी एकामागोमाग एक पहायला मिळत आहे. 'राजा शिवाजी' हा चित्रपट देखील त्या मेजवानीतलाच एक महत्त्वाचा पैकीच एक. 'राजा शिवाजी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कामगिरी करत मोठे यश मिळवले आहे. अभिनेता-दिग्दर्शक रितेश देशमुखच्या या ऐतिहासिक चित्रपटाने केवळ प्रेक्षकांची मने जिंकली नाहीत, तर कमाईच्या बाबतीतही अनेक मोठं मोठे विक्रम मोडीत काढले आहे.

**बॉक्स ऑफिसवर किती कमाई ?**

राजा शिवाजी हा चित्रपट सुमारे ७५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेला आहे. विशेष म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीतील हा आतापर्यंतचा सर्वात महागडा मराठी चित्रपट मानला जातो. बजेट मोठे असल्याने या चित्रपटासमोर कमाईचे देखील मोठे आव्हान होते. मात्र चित्रपटाने अपेक्षेपेक्षाही सरस काम गिरी करत गुंतवणूकदारांना मोठा दिलासा दिला. चित्रपटाने प्रदर्शित होताच भारतात १२.४ कोटी रुपयांची ओपनिंग केली. आणि इथेच पहिला रेकॉर्डही तोडला कारण मराठी चित्रपटांच्या इतिहासातील ही सर्वात मोठी ओपनिंग ठरली गेली. त्यानंतरही चित्रपटाची कमाई सातत्याने सुरूच राहिली. उत्तम कथा, प्रभावी अभिनय, भव्य सेट आणि जोडीला भन्नाट संगीतामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाला मोठी पसंती दिली.

**बॉक्स ऑफिस कलेक्शन १२९.७ कोटी रुपये**

संपूर्ण थिएटर रनमध्ये 'राजा शिवाजी'ने भारतात १०५.६८ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले. तर भारतातील ग्रॉस कमाई १२४.७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. परदेशातूनही चित्रपटाने ५ कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे चित्रपटाचे एकूण जागतिक बॉक्स ऑफिस कलेक्शन १२९.७ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले.कमाईच्या तुलनेत पाहता, ७५ कोटी रुपयांच्या बजेटवर चित्रपटाने ३०.६८ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. म्हणजेच गुंतवणुकीवर सुमारे ४०.९ टक्के परतावा मिळाला आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर 'राजा शिवाजी' हा यशस्वी झाला आहे.

# पिंपरी चिंचवड मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत उत्साहात



पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – पिंपळे सौदागर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्रमांक ५१ मध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. सोम वार दि. १५ रोजी शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका सुरेखा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदा शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे गुलाबाच्या पाकळ्यांच्या पार्श्वभूमीवर कुंकुवाच्या पाण्यात बुडवून ठसे घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रभागातील राष्ट्रवादीचे नगरसेवक विठ्ठल नाना काटे, भाजपाच्या नगरसेविका, डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे तसेच सामाजिक कार्यकर्ते संजय भिसे यांना निमंत्रित करण्यात आले होते. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात येऊन खाऊ साठी बिस्किटांचे पुडे देण्यात आले. विशेष म्हणजे शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके आणि गणवेशाचेही वाटप करण्यात आले. पोषण आहारात लापशी देण्यात आली. शाळेच्या परिसरात पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन हनुमंत माने यांनी केले. श्यामल दौंडकर यांनी आभार मानले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या चारशेच्यावर असून गेल्या सात – आठ वर्षांपासून दरवर्षी विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात येत असून त्यासाठी सर्व शिक्षकवृंदांचे सहकार्य मिळत असल्याची माहिती मुख्याध्यापिका सुरेखा जोशी यांनी दिली.

# ४२वेळा रक्तदान करणारे प्रशांत घाणेकर यांचा वैजापुरात 'रक्तदाता'दिन औचित्य साधत सत्कार



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – आपल्या ३८ वर्षाच्या जीवनात ४२ वेळा रक्तदान करून समाजिक बांधिलकी जपणारे व राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणारे रक्तदाता प्रशांत घाणेकर यांचा रक्तदाता दिनाचे औचित्य साधत सोमवार (ता.१५) रोजी शालिवाहन पतसंस्था, शाखा वैजापूरच्या वतीने चेअरमन किशोर सिंह चौहान, सामाजिक कार्यकर्ते व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांचा भेट वस्तू, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देवून यथोचित सत्कार करण्यात आला. शालिवाहन पतसंस्था शाखा वैजापूर च्या ९ व्या वर्धापन दिन निमित्त आयोजित रक्तदान शिबीरात ४२ वेळा श्री घाणेकर यांनी रक्तदान केले.

धोंडीरामसिंह राजपूत यांनी त्यांच्या या कार्याचा गौरव करीत त्यांना आशीर्वाद दिलेत या प्रसंगी सल्लागार बाळासाहेब चव्हाण, राजेन्द्र व्यवहारे, शाखाधिकारी सागर डघळे व कर्मचारी वृंद उपस्थित होता. छत्रपती संभाजीनगर येथील श्री. सत्यसाई ब्लड सेंटर यांनी रक्त संकलित केले.

# गुण हे यशाचे एक मापदंड, व्यक्तिमत्त्व विकास हीच खरी यशाची गुरुकिल्ली - प्रवीण बागडे

नागपूर, दि. १५ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय सर्वधर्म समाज पार्टीच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळिवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम रविवारी गृहनिर्माण सोसायटी, बजरंग नगर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अब्दुल वहीद पटेल होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून डॉ. अब्दुल बारी व कवी तन्हा नागपुरी उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून प्रशासकीय अधिकारी व सामाजिक विचारवंत प्रवीण बागडे, ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर सोमकुवर तसेच आयु. अशोककुमार डोहारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रवीण बागडे म्हणाले की, ङ्गगुण हे यशाचे एक मापदंड असले तरी व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि सातत्यपूर्ण ज्ञानार्जन हीच खरी




यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अब्दुल बारी यांनी सर्वधर्म समभाव, सामाजिक सलोखा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या यशामागील पालक व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या यशोगाथा मांडल्या. उपस्थित पालकांनी अशा प्रेरणादायी उपक्रमांचे स्वागत करत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी व्यासपीठावर महिपाल मेश्राम, किरण गायकवाड, बबला पाटील, भरत पानतावणे, विनील चौरासिया व चंद्रभान चकोले प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आयोजकांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## छत्रपती संभाजीनगरात उष्णतेचा कडाका

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – शहरासह जिल्ह्यात आज हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. कमाल तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून नागरिकांनी दुपारच्या वेळेत विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, किमान तापमान सुमारे २५ अंश सेल्सिअस राहणार आहे. दुपारच्या वेळी उष्णतेची लाट (हीट वेव्ह) जाणवण्याची शक्यता असल्याने शक्यतो थेट सूर्यप्रकाशात जाणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे तसेच वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यावी, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'रात्री जेवायला काय करू?' - जगातील सर्वात अवघड आणि न सुटलेलं कोडं!

'ब्रह्मांड कसं तयार झालं?', 'आधी कोंबडी आली की अंडं?' किंवा 'कटप्पाने बाहुबलीला का मारलं?'... या सगळ्या प्रश्नांची उत्तरं विज्ञान आणि गुगल शोधून काढेल हो. पण गेल्या काही हजार वर्षांत मानवजातीला एका अत्यंत गहन, क्लिष्ट आणि गूढ प्रश्नाचं उत्तर शोधता आलेलं नाही. तो प्रश्न म्हणजे – 'रात्री जेवायला काय करू?'

हा प्रश्न नसून एक 'कौटुंबिक ब्रह्मास्त्र' आहे, जे रोज संध्याकाळी ६ ते ७ च्या दरम्यान प्रत्येक घरातील गृहिणीच्या डोक्यात डागलं जातं.

दिवसभराची सगळी कामं आटोपून गृहिणी जरा कुठे सोफ्यावर टेकते, तोच तिच्या डोक्यात एक धोक्याची घंटा वाजते. फ्रिज उघडून नुसतं पाहिलं जातं (जणू काही फ्रिज स्वतःहून भाजी चिरून देणार आहे!). पण समोर दिसतात फक्त अर्धा टोमॅटो, दोन सुकलेल्या मिरच्या आणि कालच्या भाजीचं उरलेलं कढण. आणि मग सुरू होतो, घरातल्या सदस्यांशी संवादाचा (वादाचा) ऐतिहासिक सोहळा!

जेव्हा गृहिणी अत्यंत आशेने घरातल्यांना विचारते, 'आज रात्री जेवायला काय करू ग बाई?', तेव्हा मिळणारी उत्तरं ही मराठी साहित्यातील उत्कृष्ट विनोदी नमुने ठरतील. पतीरायांचे उत्तर असते, 'काहीही कर, मला चालतं!' (टीप: हा जगातला सगळ्यात मोठा सापळा आहे. 'काहीही' मध्ये जर तुम्ही मेथीची भाजी केली, तर लगेच तोंड वाकडं होतंङ्ग 'अरेरे, रात्री मेथी कोण खातं?'). मुलांचे उत्तर ठरलेले असते, 'मम्मी, काहीतरी चमचमीत कर ना!' (चमचमीत म्हणजे काय? रोज रात्री पिझ्झा-बर्गर किंवा पनीर टिक्का बनवायला घर काय हॉटेल आहे?). त्यात सासूबाईचे आपले वेगळेच सांगणे असते, 'बघ बाई, तुझ्या आवडीचं कर, मला फक्त तेल-मसाला नसलेलं, मऊ आणि पचायला हलकं काहीतरी दे!'. थोडक्यात काय, तर पूर्ण स्वातंत्र्य देऊनही कोणालाच काही सुचत नसतं, पण शेवटी सगळी जबाबदारी मात्र बिचाऱ्या गृहिणीवरच येऊन पडते.

जेव्हा घरातून काहीच उत्तर मिळत नाही, तेव्हा गृहिणी 'यूट्यूब'चा आधार घेते. तिथे सर्च केलं जातं: '१० मिनिटांत बनवा रात्रीचा सोपा डिश'. पण तो व्हिडिओ सुरू झाला की समजते, त्या सोप्या डिशसाठी शेकडो गोष्टी लागतातङ्ग अवोकॅडो, ऑलिव्ह ऑईल, चिली फ्लेक्स आणि माहित नाही कुठलं कुठलं चीज! शेवटी गृहिणी वैतागून फोन बंद करते आणि आपल्या नेहमीच्या 'कढई'कडे वळते.

सर्व विचारमंथन, वादविवाद आणि नकारांचे टप्पे पार पडल्यावर, रात्री ८:३० वाजता गृहिणी स्वतःच्या हुकूमशाही अधिकाराचा वापर करते. जगातल्या ९०% घरांमध्ये रात्रीच्या जेवणाचा शेवट याच तीन हुकमी पर्यायांपैकी एकाने होतो:

१. वरण-भात अनब बटाट्याची कापं: हा जगातला सर्वात सुरक्षित, सोपा आणि सगळ्यांचा आवडता मेन्यू.

२. खिचडी-पापड-लोणचं: जेव्हा गृहिणी पूर्णपणे थकलेली असते, तेव्हा 'खिचडी सम्राट' प्रकट होतो.

३. पिठलं-भाकरी किंवा पोळी: काही सुचत नसेल तर बेसन झिंदाबाद!

रोज रात्री जेवणाचे ताट समोर आल्यावर सुटकेचा श्वास टाकणारे घरचे लोक तृप्त होऊन जेवतात. पण त्यांना काय ठाऊक, हे जेवण बनवण्यामागचं 'लॉजिस्टिक', 'प्लॅनिंग' आणि मानसिक कसरत इस्रोच्या उपग्रह सोडण्यापेक्षा कमी नव्हती!

रात्रीचं जेवण संपतं, भांडी घासून होतात. गृहिणी सुखाची पाठ टेकते... आणि डोळे मिटता मिटता अचानक तिच्या डोक्यात पुढचा विचार वीज चमकल्यासारखा येतोङ्ग 'उद्या सकाळी डब्याला काय करू??'

आणि हे चक्र असं चं अखंड चालत राहतं!

## खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा एल्गार

# केंब्रिज चौकात काँग्रेसचे रास्ता रोको आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांना रासायनिक खत खरेदीसाठी वापरण्यात येणाऱ्या मोबाईल आधारित बुकिंग प्रणालीमुळे होत असलेल्या गंभीर गैरसोयीविरोधात खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता केंब्रिज चौक, जालना रोड, चिकलठाणा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटी, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित या आंदोलनात जिल्हाभरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांकडून मोबाईल आधारित खत बुकिंग प्रणालीबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याने खासदार डॉ. कल्याण काळे यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सदर प्रणाली स्थगित करण्याची मागणी केल्यानंतरही प्रश्न मार्गी न लगल्याने शेतकऱ्यांच्या भावना व अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

आंदोलनादरम्यान जालना रोडवरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. 'खतासाठी हेलपाटे बंद करा', 'शेतकऱ्यांना न्याय द्या', 'वेळेत खत द्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. शासनाच्या नव्या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना वारंवार कृषी सेवा केंद्रांवर जावे लागत असून बुकिंग प्रक्रिया, सर्व्हर समस्या आणि वितरणातील तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी त्रस्त झाल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना खासदार डॉ. कल्याण काळे म्हणाले की, 'शेतकरी आधीच नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींचा सामना करीत आहे. अशा परिस्थितीत खतासारख्या अत्यावश्यक कृषी निविष्ठेसाठी त्याला तासन्तास प्रतीक्षा करावी लागणे, वारंवार फेऱ्या माराव्या लागणे आणि वेळेत खत मिळेल की नाही याची चिंता करावी लागणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेली कोणतीही व्यवस्था शेतकऱ्यांच्या अडचणी वाढविणारी ठरता कामा नये.'



त्यांनी पुढे सांगितले की, खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना वेळेत रासायनिक खते उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने सदर मोबाईल आधारित बुकिंग प्रणालीचा तातडीने फेरविचार करून शेतकऱ्यांना होणारी गैरसोय दूर करावी. आवश्यक सुधारणा होईपर्यंत पूर्वीप्रमाणे सुलभ व सुरळीत खत वितरण व्यवस्था सुरू ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास बापू औताडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम जगन्नाथ काळे, विश्वास औताडे, भाऊसाहेब जगताप, श्रीमंत उकिर्डे, अशोक नाबदे, अतिश पितळे, गौरव जैस्वाल, फुलंब्री तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संतोष मेटे, तालुकाध्यक्ष सुर्यकांत गरड, संतोष शेजुळ, कल्याण चव्हाण, जगदीश डवले, अमोल काकडे, जमील शेख, नंदकिशोर काकडे, मुसा पटेल, पंचायत समिती सदस्य विठ्ठल कोरडे, गजानन मते, दत्तु काका ठोंबरे, शिवाजी ढाकणे, ज्ञानेश्वर पठाडे, सावता गाडेकर, सुरेश शिंदे, डॉ.जब्बार खान, यांच्यासह विविध पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात रासायनिक खते उपलब्ध होणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, शेतकऱ्यांच्या अडचणी वाढविणारी कोणतीही व्यवस्था स्वीकारली जाणार नाही,' असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्याची भूमिका कायम राहील आणि शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असा निर्धार यावेळी आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

## रथातून विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन; मनपा शाळांचा प्रवेशोत्सव उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, नारेगाव (मराठी व उर्दू) येथे सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त शहरस्तरीय शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांचे सजविलेल्या रथातून शाळेत आगमन झाल्याने कार्यक्रमाला अनोखे स्वरूप प्राप्त झाले.



या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री अतुल सावे, महापौर समीर राजूरकर, नगरसेवक मतीन पटेल, गोकुळ मलके, काकासाहेब काकडे, सिद्धार्थ साळवे, मनपा आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे, पंचायत समिती सभापती कल्याण गायकवाड, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे यांच्यासह विविध पदाधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्प, चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच नवीन गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

मंत्री अतुल सावे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, 'पूर्वी विद्यार्थी शाळेत जाताना रडत असत; मात्र आज शाळेत येण्याबाबत त्यांच्यात उत्साह आहे. पहिल्याच दिवशी गणवेश, पुस्तके आणि विविध सुविधा मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे.' त्यांनी शाळेच्या मैदानाच्या विकासासाठी आमदार निधीतून ५० लाख रुपयांची मदत जाहीर केली. तसेच 'अन्नामृत' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छ, पौष्टिक व सात्त्विक भोजन उपलब्ध करून दिले जात असल्याचे सांगितले.

महापौर समीर राजूरकर यांनी शाळेसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तातडीने करण्यात येईल तसेच संरक्षण भिंतीचे काम पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

पालकांना संबोधित करताना त्यांनी मुलांमध्ये स्वच्छतेच्या सवयी, कचरा न टाकणे, सार्वजनिक ठिकाणी न थुंकणे आणि चांगला नागरिक बनण्याचे संस्कार रुजविण्याचे आवाहन केले. पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना आयुक्त येडगे यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आवाहन केले. 'एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये. पहिलीपासून दहावीपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष द्यावे. दहावीचा निकाल शंभर टक्के लागण्यासाठी प्रयत्न करावेत. दहावीनंतरही विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवून त्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी मार्गदर्शन करावे,' असे ते म्हणाले. सुमारे चार हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या शाळेतील मूलभूत सुविधांबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. मनपा केंद्रीय शाळेच्या मुख्याध्यापिका तिलोत्तमा मापारी यांनी प्रास्ताविक केले. उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर शेख यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता पाटील व फेरोजखान पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, बालताई, सेवक तसेच पालकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत गणवेश, पाठ्यपुस्तकांचे वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- आज १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली आहे.या निम्मित आयुक्तअमोल येडगे यांच्या आदेशानुसार सर्व मनपा शाळेत प्रवेशउत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली होती.

या अनुषंगाने बनेवाडी महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती श्री.अनिल मकरिये यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी बोलताना अनिल मकरिये यांनी, 'माझ्या तर्फे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन वह्या व वॉटर बॉटलचे वाटप करण्यात येणार आहे,' अशी घोषणा केली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षण, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण जडणघडणीच्या माध्यमातून विद्यार्थी



यशाच्या शिखरावर पोहोचावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी शहर अभियंता संजय कोंबडे,मुख्याध्यापक डॉ .संपत इधाटे,शिक्षक,पालक यांची उपस्थिती होती. शाळेच्या पहिल्या दिवशी झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## पडेगाव येथील पोलीस कॉलनीत Greenfield International Pre-School चे भव्य उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- पडेगाव येथील पोलीस कॉलनी परिसरात Greenfield International Pre-School च्या नव्या शैक्षणिक केंद्राचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्री-स्कूलमधील आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धती तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. आधुनिक शिक्षणासोबत संस्कारांची जोड देणारे हे शैक्षणिक केंद्र परिसरातील विद्यार्थ्यांसाठी नवी दिशा आणि संधी निर्माण करणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या पदाधिकारी व व्यवस्थापन मंडळाचे अभिनंदन करण्यात आले. तसेच संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मां. नगरसेविका श्रीमती कीर्ती शिंदे,संचालक सम्राट घारे,अध्यक्ष माधुरी घारे,मुख्याध्यापक शर्मिला आर्या,शिक्षिका आम्रपाली ठोंबरे आदींची उपस्थिती होती.

या उद्घाटन सोहळ्यामुळे पडेगाव परिसरातील पालक व



विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, दर्जेदार पूर्व-प्राथमिक शिक्षणाची नवी दालने खुली झाली आहेत. Greenfield International Pre-School च्या माध्यमातून बालकांच्या शैक्षणिक, बौद्धिक आणि सामाजिक विकासाला निश्चितच नवी चालना मिळणार असल्याचा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

## उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने ज्येष्ठांना एन.सी.एम.सी. कार्डचे वितरण

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- शासनाच्या जनकल्याण योजनेअंतर्गत राज्य परिवहन महामंडळाच्याच्या वतीने नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्डचा ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेऊन उर्वरित आयुष्यात आवडेल त्याठिकाणी प्रवास करुन जीवनाचा परिपूर्ण आनंद घ्यावा असे प्रतिपादन भाजपा पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीच्या दरातील एन.सी. एम. सी. कार्ड वाटप समारंभात ते बोलत होते. रविवार दि. १४ रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते विजूसेठ जगताप, भाजपा नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, नगरसेविका अनिता काटे तसेच जयनाथ काटे, शारदा मुंडे, कैलास कुंजीर, परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघटनांचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, अशोक वारकर, विलास नगरकर, रामभाऊ साळुंके, संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचे




अध्यक्ष विलास जोशी, आनंद हास्य योगा क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे, ए. ए. नाईकवाडे, मैत्रेयी जोग, भारती न्यायाधीश हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने पिंपळे सौदागर येथील एक हजार ज्येष्ठ नागरिकांना मोफत स्वरुपात एन. सी. एम. सी. या कार्डचा लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ९५६ ज्येष्ठांना त्यात समाविष्ट करुन घेण्यात आले असल्याची माहिती उन्नतीचे संचालक संजय भिसे यांनी दिली. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून या कार्यक्रमात सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या भारती न्यायाधीश आणि क्रिडा क्षेत्रातील मैत्रेयी जोग यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन प्रा. प्रेमलाल लांजेवार यांनी केले तर संजय भिसे यांनी आभार मानले.

## शिवाजीनगर भुयारी मार्गात जड वाहनांना प्रतिबंध; नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- शिवाजीनगर भुयारी मार्ग येथे जड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही अनेकदा जड वाहने या मार्गातून नेली जात होती. त्यामुळे भुयारी मार्गात वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

या बाबीची गांभीर्याने दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शिवाजीनगर भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूंना गार्डर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे जड वाहनांना भुयारी मार्गातून प्रवेश करणे शक्य होणार नाही.

तथापि, यानंतरही कोणी जड वाहन भुयारी मार्गातून नेण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित वाहनचालकाविरुद्ध वाहतूक विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा शहर अभियंता संजय कोंबडे यांनी दिला आहे.

नागरिकांनी व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## कुणबी जात प्रमाणपत्र:नागरिकांना मार्गदर्शनासाठी हेल्पलाईन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा कुणबी, कुणबी मराठा, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागाच्या शासननिर्णयानुसार हैदराबाद गॅझेटियर मधील नोंदी विचारात घेऊन पात्र व्यक्तिंना मराठा-कुणबी, कुणबी मराठा, कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांना येणाऱ्या समस्यांबाबत मदत व मार्गदर्शन व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे ०२४०-२९८८०७७ हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रासह अर्ज करावे. त्याबाबत काहीही अडचण असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकट्याने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म- मृत्यू इत्यादी ठिकाणी, सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म-मृत्यू प्रसंगी जाऊन पैशांची मागणी करतात. तसेच ट्रॉफिक जंक्शन, रोडवर इ. विविध ठिकाणी फिरत आहेत आणि वाहनचालक आणि इतर जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना त्रास देऊन पैसे देण्यास भाग पाडत आहेत, याची पोलीस प्रशासनाचे गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे उपद्रव रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये अन्वये पोलीस आयुक्ताल याच्या कार्यक्षेत्रात येत्या दि.१४ जून ते दि.१२ ऑगस्ट पर्यंत असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

(पान १ वरुन)

### अमेरिका-इराण यांच्यात शांतता करार,..

आणि इराण यांच्या शांतता करार झाला आहे. दोनही पक्षांनी सर्व मुद्यांवर, याशिवाय लेबनॉनमधील लष्करी कारवाई थांबवण्यावर सहबती दर्शवली. पश्चिम आशियातील संघर्षावर मार्ग काढण्याच्या अमेरिका आणि इराण यांच्यातील कटिबद्धतेसाठी सहकार्य करणाऱ्या इतर देशांचे आभार, असंही शहबाझ शरीफ म्हणाले.

जगातील एकूण कच्च्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यापैकी जवळपास २० टक्के भाग याच मार्गावरून जातो. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी युद्ध सुरू झाल्यानंतर इराणने हा जलमार्ग पूर्णपणे बंद केला होता. एप्रिल २०२६ मध्ये पाकिस्तानमधील शांतता चर्चा अपयशी ठरल्यानंतर अमेरिकेने इराणच्या बंदरांना नौदलाने घेरले होते. मार्ग मोकळा झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती कमी होण्याची दाट शक्यता आहे.

### ज्यांना जायचे आहे, त्यांनी...

ठाकरेंनी काढले.

दरम्यान याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे युवा नेते व आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे. ते म्हणाले, मला वाटते की आपण अफवांवर विश्वास ठेऊ नये. उद्धव साहेब आणि मी, आम्ही एक पथ्य पाळले आहे की जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर आम्ही अंधविश्वास ठेवतो. काही काही लोक अंधभक्त असतात, आम्ही अंधविश्वास ठेवणारे लोक आहोत.

सगळे खासदार जे काही निवडून आले आहेत २०२४ च्या लाटेमध्ये उद्धव साहेब प्रत्येक मतदारसंघात गेले आहेत. आम्ही असू, पवार साहेब असत आम्ही सगळ्यांनी प्रचार केला होता. लोकांनी मशाल या चिन्हावर निवडून आणले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे कालच्या आमच्या बैठकीत आपण पाहिले असेल सगळेच लोक तिथे उपस्थित होते, काही ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते आणि सगळे सोबत आहेत. तसेच ऑनलाइन येण्यात चुकीचे काय? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

### विदर्भ वगळता राज्यातील शाळा...

प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आता १५ जूनऐवजी ३० जूनपासून सुरू होतील. विदर्भातील सध्याचे उष्णतामान, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे निर्देश लक्षात घेऊन शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी आणि शाळा व्यवस्थापनांना याबाबतचे निर्देश जारी केले आहेत.

शासनाच्या परिपत्रकानुसार, राज्यातील सर्व शाळा १५ जूनपासून सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातील वाढते उष्णतामान आणि उन्हाळी सुट्ट्यांचा कालावधी यामुळे या भागातील शाळा उशिरा सुरू करण्याची मागणी पुढे आली होती. या मागणीच्या अनुषंगाने काही शिक्षक संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती.

### मंत्री गिरीश महाजनांच्या मध्यस्थीने...

निर्णय होऊ शकतो. यासाठी चर्चा करावी लागेल असे महाजन म्हणाले. सरकार शेतकऱ्यांसाठी सकारात्मक आहे. शेतकऱ्यांचे ज्यावेळी नुकसान झाले त्यावेळी सरकारनं चांगली मदत केली असल्याचे महाजन म्हणाले. कर्जमाफीमध्ये सुधारणा झाली पाहिजे, असे वाटत असेल तर आपण चर्चा करु. २२ तारखेच्या आत यामध्ये बैठक घेऊ असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे महाजन म्हणाले. मुख्यमंत्री जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असे महाजन म्हणाले.

महात्मा फुले यांच्या नावाने २०१९ मध्ये जी कर्जमाफी झाली, त्या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी लाभ घेतला, त्या शेतकऱ्यांना आताच्या या योजेनेमध्ये लाभ मिळू शकतो. या सर्व शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंतचा लाभ झाला पाहिजे. रेग्यूलर कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये देण्यात येणार आहे, पण यामध्ये वाढ करावी अशी मागणी रोहित पवारांनी केली.

या योजनेतील अटीमुळं अनेक शेतकऱ्यांवर अन्याय होतोय, त्यामुळं या योजनेतील अटी काढाव्यात असे रोहित पवार म्हणाले. सरकारकडे चर्चेसाठी जाताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी, रविकांत तुपकर, किसान सभेचे डॉ. अजित नवले, शेकापचे जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हर्षवर्धन सपकाळ हे सर्वजण येतील असे रोहित पवार म्हणाले.

सरकारला विनंती आहे की, येणारं वर्ष कठीण आहे यंदा पाऊस कमी पडणार आहे. शेतात काही पिकणार नाही. पिके जळून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं कर्जमाफी योजना अटीशिवाय लागू करणं गरजेचं आहे असे रोहित पवार म्हणाले. त्याचबरोबर १ रुपयामध्ये जी पिक विमा योजना होती. ती पिक विमा योजना परत सुरु करावी अशी विनंती देखील रोहित पवार यांनी केली आहे.

## मनपा प्रियदर्शनी विद्यालयात विद्यार्थ्यांची घोड्यावरून मिरवणूक; प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- आज महानगरपालिकेच्या प्रियदर्शनी विद्यालयात प्रवेशोत्सव चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी उपमहापौर राजेंद्र जंजाळ, महिला व बालकल्याण सभापती श्रीमती.शोभाबुरांडे,नगरसेविका अर्चना निळकंठ व अनिता मानकापे तसेच उपायुक्त लखीचंद चव्हाण, सागर निळकंठ, किशोर मानकापे, डायटच्या वरिष्ठ अधिव्याख्याता मंजुश्री क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी सुरुवातीला नवप्रवेशित विद्यार्थ्यांची घोड्यावर व घोडा गाडीवर बसवून मिरवणूक काढण्यात आली. शोभा यात्रेमध्ये पालखी सजवण्यात आली होती. पालखीमध्ये सरस्वतीची मूर्ती व बालभारतीचे पुस्तक ठेवण्यात आले होते, मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक शोभायात्रेमध्ये सहभागी झाले होते. लेझीम ढोल ताशे व बँड च्या निनादांमध्ये लहान मुलं नाचत होती त्यांना पाहून पाहुण्यांना सुद्धा राहवले नाही व त्यांनीही मुलांसोबत नृत्यात सहभाग घेतला. शोभा यात्रेमध्ये कार्टूनचे ड्रेस घातलेले अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रारंभी सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. उपमहापौर राजेंद्र जंजाळ व सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेश चे वाटप करण्यात आले. अण्णामृत फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना आज खिचडी सोबत सोनपापडी व चिवडा चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासन अधिकारी तथा मुख्याध्यापक संजीव सोनार व संचलन तेजस्विनी देसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.